ePaper

| वर्ष - 6 । अंक - 152 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार । दिनांक 11 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## "महाराष्ट्रात तमाशा...", नाना पटोलेंची एकनाथ शिंदे सरकारवर आगपाखड



### आतील पानांत


- लोणावळ्यात पारंपरिक उत्साहात विसर्जन मिरवणूक
- गणरायाला भावपूर्ण निरोप...
- "३ काय ३० पक्ष एकत्र आले तरी...."


# 90 % शहर खड्डेमुक्त!

## पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाचा दावा : उर्वरित खड्डे भरण्याचे आयुक्तांचे आदेश

पिंपरी ।।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांवरील सुमारे ९० टक्के खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण झाले असून नागरिकांच्या तक्रारींची गंभीरतेने दखल घेऊन उर्वरित खड्डे बुजविण्याचे आदेश महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. नागरिकांना पायाभूत सुविधा पुरविताना कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही याबाबत महापालिकेच्या वतीने दक्षता घेण्यात येते.**



प्रभागनिहाय आकडेवारी

| प्रभाग | एकूण खड्डे | एकूण भरलेले खड्डे |
|---|---|---|
| अ | [illegible] | [illegible] |
| ब | [illegible] | [illegible] |
| क | [illegible] | [illegible] |
| ड | [illegible] | [illegible] |
| इ | [illegible] | [illegible] |
| फ | [illegible] | [illegible] |
| ग | [illegible] | [illegible] |
| ह | [illegible] | [illegible] |
| एकूण | [illegible] | [illegible] |

**पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांवरील सुमारे ९० टक्के खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण झाले असून नागरिकांच्या तक्रारींची गंभीरतेने दखल घेऊन उर्वरित खड्डे बुजविण्याचे आदेश महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. नागरिकांना पायाभूत सुविधा पुरविताना कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही याबाबत महापालिकेच्या वतीने दक्षता घेण्यात येते.**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पावसाळ्यापूर्वीच रस्त्यांबाबत असणारी कामे पूर्ण करण्यात आली आहेत. आवश्यकतेनुसार डांबर, कोल्ड मिक्सने खड्डे भरले आहेत. इतर ठिकाणी मुरूम,खडी तसेच काँक्रिटने करून खड्डे बुजविण्याचे काम देखील करण्यात आले आहे. परंतु, पावसामुळे काही ठिकाणी पुन्हा खड्डे निर्माण झाले आहेत. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून महापालिका यंत्रणेचे ते खड्डे बुजविण्याचे काम युद्धपातळीवर सुरु केले आहे. काही ठिकाणी खड्ड्यांमध्ये पाणी साचले असल्याचे तसेच गणेश विसर्जनासाठी खड्ड्यांमुळे अडथळा निर्माण होत असल्याबाबत नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. अशा परिस्थितीत संबंधित विभागाने रस्त्यांवरील खड्डे तात्काळ बुजवावेत तसेच ज्या भागात पाणी साचते तेथे वेळेत उपाययोजना कराव्यात, याबाबतचे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी प्रशासनाला दिले आहेत. महापालिका यंत्रणेचे खड्डे बुजवण्याचे काम निरंतर सुरु असून खड्ड्यांसंदर्भात नागरिकांच्या आलेल्या तक्रारींचा निपटारा तातडीने केला जात असल्याची माहिती संबंधित आधिका-यांनी दिली.

---

# मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांची गणेश मंडळाप्रती कृतज्ञता!

## सामाजिक कार्यकर्त्यांच्या सामाजिक कार्यामुळे बापांचा आनंदी सोहळा शांततेत पार

पिंपरी ।।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

यंदा कोरोनाचं सावट गणपती बाप्पाने दूर केलं. शहरात मोठ्या थाटामाटात वाजत गाजत गणरायांचं आगमन झालं आणि काल त्यांना आनंदी वातावरणात निरोप दिला.

गणेश मंडळांनी कोरोना काळात सामाजिक मदतकार्य केले. त्यांच्यामुळेच खरे तर आज बापांचा आनंदी सोहळा शांततेत पार पडला, त्यामुळे शहरातील सर्व गणेश मंडळाचे आभार मानावे तेवढे कमी आहेत, अशा शब्दांत मनसे शहराध्यक्ष



सचिन चिखले यांनी गणेश भक्तांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सचिन चिखले यांनी गणेशोत्सवात पिंपरी चिंचवड शहरातील विविध गणेश मंडळांना भेटी दिल्या. भेटीदरम्यान प्रभागातील व

### गणेश मंडळाचे आभार मानावे तेवढे कमी

**गणेश मंडळांनी कोरोना काळात सामाजिक मदतकार्य केले. त्यांच्यामुळेच खरे तर आज बापांचा आनंदी सोहोळा शांततेत पार पडला, त्यामुळे शहरातील सर्व गणेश मंडळाचे आभार मानावे तेवढे कमी आहेत, अशा शब्दांत मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी गणेश भक्तांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.**

शहरातील २३८ मंडळांशी हितगुज साधत श्रींचे दर्शन घेतले. मागील दोन वर्ष कोविडचा काळ कठीण होता. त्यावेळी शहर मनसेने कोणताही भेदभाव न करता सर्वांना मदतकार्यात भाग घेतला.

त्यामुळे अनेकांचे प्राण वाचले, अनेकांना वेळेवर मदत मिळाली, अनेकजण आपल्या मूळ गावी सुखरूप पोहोचले. गणेश भक्तानी गेली कित्येक वर्ष केलेल्या गणरायांच्या सेवेमुळे आपल्याला यंदा गणेशोत्सव आनंदाने साजरा करता आला, असे चिखले यांनी म्हटले आहे.

# लोणावळ्यात पारंपरिक उत्साहात विसर्जन मिरवणूक!

## पावसाची हजेरी, साडेसात तासांनी मिरवणुकीची सांगता

। पुणे। महाईन्यूज ।



**लोणावळ्यात ढोल ताशांचा गजरात विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. साडेसात तासांनी मिरवणुकीची सांगता झाली. विसर्जन मिरवणुकीत पावसाने हजेरी लावली. लोणावळ्यात शुक्रवारी सायंकाळी साडेसहा वाजता मानाचा पहिला रायवुड गणेश मंडळाच्या मिरवणुकीस मावळा चौकातून प्रारंभ झाला. त्यामागोमाग मानाचा दुसरा तरुण मराठा मंडळ, गावठाण, मानाचा तिसरा रोहिदास तरुण मंडळ, मानाचा चौथा गवळीवाडा, मानाचा पाचवा शेतकरी भजनी मंडळ, वळवण, मानचा सहावा राणाप्रताप नेताजी मित्र मंडळाचे गणपती होते.**

मानाच्या मंडळासह विसर्जन मिरवणुकीत सहभागी झालेल्या मंडळांच्या समोर ढोल ताशा पथकांनी वादन सादर केले. लोणावळा नगरपरिषद, शहर पोलीस ठाणे, गणराया पुरस्कार समिती, भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना, सत्यनारायण समितीकडून मंडळांचे स्वागत करुन पुष्पवृष्टीकरण्यात आली. सत्यानंदन तीर्थधाम आश्रमाकडून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. रामदेव बाबा भक्त मंडळ, लायन्स क्लबकडून भाविकांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. मध्यरात्री दीडच्या सुमारास विसर्जन मिरवणुकीची सांगता झाली. लोणावळा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रशासक पंडीत पाटील यांच्य मार्गदर्शनाखाली मिरवणुकीचे नियोजन करण्यात आले. लोणावळ्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी भाऊसाहेब ढोले, शहर पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक सीताराम डुबल यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# ध्वनिप्रदूषण करणाऱ्या मंडळांच्या विरोधात कारवाई

## मिरवणुकीत उच्चक्षमतेची ध्वनिवर्धक वापर करून ध्वनिप्रदूषण करणाऱ्या मंडळांची नोंद



। पुणे। महाईन्यूज ।

विसर्जन मिरवणुकीत उच्चक्षमतेची ध्वनिवर्धक वापर करुन ध्वनिप्रदूषण करणाऱ्या मंडळांची नोंद करण्यात आली असून अशा मंडळांच्या विरोधात कारवाई करण्यात येणार विसर्जन मिरवणुकीत उच्चक्षमतेची ध्वनिवर्धक वापर करुन ध्वनिप्रदूषण करणाऱ्या मंडळांची नोंद करण्यात आली असून अशा मंडळांच्या विरोधात कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिला. कार्यकर्त्यांचा उत्साह, दोन वर्षांच्या खंडानंतर विसर्जन मिरवणुकीसाठी झालेल्या गर्दीमुळे विसर्जन मिरवणूक लांबली, असे गुप्ता यांनी नमूद केले. भवानी पेठेतील कासेवाडी येथील महाराष्ट्र तरुण मंडळ विसर्जन मिरवणुकीतील शेवटचे मंडळ ठरले. या मंडळाने शनिवारी सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास 'श्रीं'चे विसर्जन केले. वैभवशाली परंपरा असलेल्या पुण्यातील विसर्जन मिरवणुकीची सांगता शनिवारी (१० सप्टेंबर) सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास झाली. त्यानंतर पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी बंदोबस्त मागे घेतला आणि मंडळे मार्गस्थ झाल्यानंतर सकाळपासून मध्यभागातील रस्ते टप्याटप्याने खुले करण्यात आले. बंदोबस्त मागे घेण्यात आल्यानंतर पोलीस आयुक्त गुप्ता यांनी पत्रकारांशी संवाद साधला. करोना संसर्गामुळे दोन वर्ष विसर्जन मिरवणुकीची परंपरा खंडीत झाली होती. कार्यकर्त्यांचा उत्साह, भाविकांची अलोट गर्दीमुळे यंदा विसर्जन मिरवणूक लांबली. विसर्जन मिरवणूक २९ तास सुरु राहिली. सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास कासेवाडीतील महाराष्ट्र तरुण मंडळाच्या 'श्रीं'चे विसर्जन झाल्याची नोंद पोलिसांनी केली, असे गुप्ता यांनी नमूद केले.

# आदर पूनावाला यांच्या नावाने सीरम इन्स्टिट्यूटची १ कोटींची फसवणूक




। पुणे । महाईन्यूज ।

सीरम इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांच्या नावाने समजमाध्यमवर बनावट माहिती पाठवून सीरम इन्स्टिट्यूटला तब्बल १ कोटी रुपयांना गंडा घालण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार ७ ते ८ सप्टेंबर दरम्यान घडला आहे.याबाबत सीरम इन्स्टिट्यूटचे वित्तीय अधिकारी सागर कित्तुर (वय ४४, रा. कोंढवा) यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर कित्तुर हे सीरम इन्स्टिट्यूटमध्ये वित्तीय व्यवस्थापक आहेत तर सतीश देशपांडे हे कंपनीचे संचालक आहेत . आदर पूनावाला हे कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी असून त्यांच्या नावे बनावट संदेश देशपांडे यांना पाठविण्यात आले. त्यात काही बँक खात्यांचे तपशील देऊन त्यावर तात्काळ पैसे पाठविण्यास सांगितले. संदेश खरे वाटल्याने कंपनीच्या खात्यावरुन विविध बँक खात्यावर एकूण १ कोटी १ लाख १ हजार ५५४ रुपये पाठविण्यात आले. त्यानंतर कंपनीची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर पोलिसांकडे फिर्याद देण्यात आली असून पोलीस निरीक्षक अश्विनी सातपुते तपास करीत आहेत.

# राज्यात सध्या 'खोके' सरकार ; सरकारला पालकमंत्री मिळेनात!

## विरोधी पक्षनेते अजित पवार यांची टीका

। पुणे । महाईन्यूज ।

पुण्याच्या विकासाचे ८७५ कोटी रूपये शिंदे-फडणवीस सरकारने अडवून ठेवले आहेत. पालकमंत्री नियुक्त होईपर्यंत त्याविषयी काहीही करायचे नाही, अशा अधिकाऱ्यांना सूचना आहेत, असे सांगत मुखयमंत्री-उपमुख्यमंत्री दोघांचाच कारभार सुरू असून अजूनही पालकमंत्री नेमलेले नाहीत, अशी टीका विरोधी पक्षनेते अजित पवार यांची केली आहे. राज्यातील सरकार म्हणजे 'खोके' सरकार आहे, अशी खिल्लीही त्यांनी उडवली. शिरूर विधानसभेतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयाचे



उद्घाटन तसेच नोकरी व शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. शिरूरचे आमदार अशोक पवार, राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख आदी उपस्थित होते. पवार म्हणाले की, सरकार येतात आणि जातात. मात्र, पहिल्या सरकारने मंजूर केलेली आणि कार्यवाहीच्या अंतिम टप्प्यात असलेली कामे नंतरच्या सरकारने अडवून धरणे चुकीचे आहे. ३६ जिल्ह्यांमध्ये १४ हजार कोटी रूपयांचा निधी दिला, त्यात पुण्याला ८७५ कोटींचा निधी आहे. मात्र सध्याच्या स्थगिती सरकारने सगळं अडवून ठेवले आहे. जिल्ह्याला पालकमंत्री मिळालेले नाही. सरकारला बाकीच्या कामांसाठी वेळ आहे, महत्त्वाच्या कामांसाठी नाही. बोललो की त्यांना मिरच्या झोंबतात. विकासकामांना स्थगिती देण्याचा सपाटा नव्या सरकारने लावला आहे. म्हणूनच आम्ही त्यांना स्थगिती सरकार म्हणतो. ही स्थगिती लवकरच उठवू, असे ते नुसतेच म्हणतात. प्रत्यक्षात कृती होताना दिसत नाही.

### महत्वाच्या विषयांवर 'तारीख पे तारीख'

'५० खोके, एकदम ओके' ही घोषणा महाराष्ट्रातील गावागावात पोहोचली आहे. संबंधित फुटीर आमदारांना त्यांच्या मतदरासंघातील जनताच यावरून जाब विचारत आहे. इंधनदरवाढ, बेरोजगारी, महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे. केंद्र सरकार मात्र बनवाबनवी करत आहे. महत्वाच्या विषयांवर 'तारीख पे तारीख' सुरू आहे, याकडे पवार यांनी लक्ष वेधले.अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेंद्र डहाळे यांनी नमूद केले.

# गणरायाला भावपूर्ण निरोप..!

## पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरात भव्य विसर्जन मिरवणूका महापालिका प्रशासनाकडून ठिकठिकाणी मंडळांचे स्वागत

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया" आणि "गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला" अशा घोषणा देत पिंपरी आणि चिंचवड परिसरात गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. उत्साही आणि आनंदी वातावरणात पारंपरिक ढोल ताशा पथक, शिवकालीन युध्दकलांची प्रात्यक्षिके, मल्लखांब, आकर्षक रथ सजावट अशा विविध स्वरूपात चिंचवड त्याचप्रमाणे पिंपरी येथे जल्लोषात निघालेल्या गणेश विसर्जन मिरवणुकांमध्ये सहभागी झालेल्या गणेश मंडळांचे महापालिकेच्या वतीने आयुक्त शेखर सिंह तसेच अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, जितेंद्र वाघ आणि उल्हास जगताप यांच्या हस्ते स्वागत करून विसर्जन सोहळ्याची सुरूवात झाली.**





महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील कराची चौक आणि चिंचवड येथील हुतात्मा चापेकर चौक येथे नियंत्रण कक्ष उभारण्यात आले होते. याठिकाणी परिसरातील अनेक गणेश मंडळांच्या मिरवणुकांचे स्वागत करण्यात आले. यामध्ये पिंपरी येथील सुमारे ४० प्रमुख तर चिंचवड येथील सुमारे ३४ गणेश मंडळांचा समावेश होता. चिंचवड येथील नियंत्रण कक्ष येथे आयुक्त शेखर सिंह त्यांच्या पत्नी ईशा सिंह, उप आयुक्त रविकिरण घोडके, क्षेत्रिय अधिकारी सोनम देशमुख तसेच माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके,माजी नगरसदस्य राजेंद्र गावडे, सुरेश भोईर, शामराव वाल्हेकर, गोविंद पानसरे, माजी महापौर अपर्णा डोके, माजी नगरसदस्या माया बारणे,माधुरी उर्फ मीनाताई कुलकर्णी, अश्विनी चिंचवडे पाटील, स्विकृत सदस्य ॲड.मोरेश्वर शेडगे,विठ्ठल भोईर यांनीही गणेशमंडळ प्रमुखांचे स्वागत केले. सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

तर पिंपरी येथील नियंत्रण कक्ष येथे आयुक्त शेखर सिंह, त्यांच्या पत्नी ईशा सिंह, उप आयुक्त रविकिरण घोडके, मुख्य अग्निशमन अधिकारी किरण गावडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहीवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रभारी प्रशासन अधिकारी शशिकांत जगताप यांच्यासमवेत माजी महापौर कविचंद भाट, माजी विरोधी पक्षनेते कैलास कदम यांनी देखील मंडळांचे स्वागत केले. महापालिकेच्या कर्मचा-यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. या दोन्ही ठिकाणी महापालिकेच्या वतीने रुग्णवाहिका, अग्निशामक वाहन, आपत्ती व्यवस्थापन पथक, महापालिकेचे सुरक्षा रक्षक, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान तैनात करण्यात आले होते. सूत्रसंचालन विशेष अधिकारी किरण गायकवाड आणि किशोर केदारी यांनी केले.

मिरवणुकीत विविध गणेश मंडळांच्या कला व क्रीडा पथकांद्वारे महापालिकेच्या नियंत्रण कक्षासमोर ढोलताशांच्या गजरात तलवारबाजी, दांडपट्टा, लाठी काठी अशा शिवकालीन साहसी खेळांचे व कलांचे चित्तथरारक प्रात्याक्षिके सादर करण्यात आले. या पथकांमध्ये लहान मुलांसह महिलांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग होता. लहान मुलांनी सादर केलेल्या साहसी खेळांच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

### महापालिका अधिकारी कर्मचारी यांच्यासह यंत्रणा तैनात

ढोलपथकांनी धरलेल्या ठेक्याने गणेशभक्तांचा आनंद ओसंडून वाहत होता. दरम्यान, शहरातील इतर विसर्जन घाटांवर देखील गणेश विसर्जन पार पडले. पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाला मंडळांनी प्राधान्य देत कृत्रिम विसर्जन हौदात मूर्ती विसर्जित केल्या गेल्या. बहुतांश मंडळांनी स्वयंसेवी संस्थांकडे विसर्जनासाठी मूर्तीदान करण्यावर भर दिला. गणपतीदान उपक्रमाला देखील उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. क्षेत्रीय अधिका-यांच्या नियंत्रणाखाली सर्व विसर्जन घाटांवर चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती. जीवरक्षक, अग्निशमन दल, सुरक्षा दल, आपत्ती व्यवस्थापन पथक, रुग्णवाहिकेसह वैद्यकीय पथक, महापालिका अधिकारी कर्मचारी यांच्यासह यंत्रणा तैनात करण्यात आली होती.

# पिंपरी-चिंचवड गणेशोत्सव : राष्ट्रवादीचे युवानेते पार्थ पवार यांची शहरात हजेरी!

## विसर्जनाच्या मिरवणुकांमध्ये फक्त सर्वसामान्यच नाही, तर राजकीय नेतेही सहभागी

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**पिंपरी चिंचवड येथील गणेशोत्सवा निमित्त काल गुरुवारी विरोधी पक्षनेते अजित पवार आणि मनसे युवानेते अमित ठाकरे यांनी शहरातील विविध गणपती बाप्पाच्या आरतीसाठी हजेरी लावली. त्यानंतर गणेश विसर्जनापूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवानेते पार्थ पवार आणि पुणे शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड शहर परिसरातील विविध गणेश मंडळाच्या श्रीगणेश आरती करिता हजेरी लावली.**





यावेळी माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, मा. विरोधी पक्षनेते नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे, ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी व नागरिक यावेळी उपस्थित होते. करोनानंतर दोन वर्षांनी निर्बंधमुक्त झाल्याने गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला असून, आज आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी भाविकांनी ठिकठिकाणी गर्दी केली आहे.

राज्यभरात अनंत चतुर्दशीचा उत्साह असून गणरायाच्या विसर्जनाला सुरुवात झाली आहे. विसर्जनाच्या मिरवणुकांमध्ये फक्त सर्वसामान्यच नाही, तर राजकीय नेतेही सहभागी होत आहेत.

## संपादकीय »

# सुरक्षा की सक्ती ?

***अपघात घडू नये याची काळजी घेणाऱ्यांना सजग प्रहरी म्हटले जाते. दुर्घटना घडल्यानंतर नियमांची जंत्री वाढविणाऱ्या यंत्रणेला तत्परतेचे गुण कसे देणार, हा प्रश्नच आहे. टाटा समूहाचे माजी अध्यक्ष सायरस मिस्त्री यांचा रस्ते अपघातात झालेला मृत्यू सर्वांसाठीच धक्कादायक होता.***

अपघात घडू नये याची काळजी घेणाऱ्यांना सजग प्रहरी म्हटले जाते. दुर्घटना घडल्यानंतर नियमांची जंत्री वाढविणाऱ्या यंत्रणेला तत्परतेचे गुण कसे देणार, हा प्रश्नच आहे. टाटा समूहाचे माजी अध्यक्ष सायरस मिस्त्री यांचा रस्ते अपघातात झालेला मृत्यू सर्वांसाठीच धक्कादायक होता. शिवसंग्रामचे नेते विनायक मेटे यांच्या अपघाती निधनानंतरही जनमानस असेच हळहळले होते. दोघांचाही मृत्यू वाहनाच्या मागच्या सीटवर बसले असताना झाला. या घटनांपासून बोध घेऊन आता वाहनात मागे बसलेल्यांनाही सीटबेल्ट सक्तीचा करणार असल्याचे सूतोवाच केंद्र सरकारने केले आहे. योजनांच्या घोषणांमध्ये केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा हात कुणीही धरू शकत नाही. तेव्हा या निर्णयाच्या अंमलबजावणीतील त्रुटींचा ते आधी अभ्यास करतील, अशी माफक अपेक्षा आहे. स्वत: गडकरी एकदा मोठ्या रस्ता अपघातातून बचावले आहेत. वर्षभरातील पाच लाख दुर्घटनांच्या आकडेवारीने तसेच त्यात मृत्युमुखी पडणाऱ्या युवकांच्या संख्येने त्यांना धक्का बसणे स्वाभाविक आहे. मात्र केवळ नियमनिर्मितीच्या गतीपेक्षा अंमलबजावणीच्या वेगावरही सुयोग्य नियंत्रण हवे. मुळात अनेक जुन्या वाहनांमध्ये मागच्या सीटबेल्टची रचना नाही. केंद्राच्या घोषणेनंतर आता एअरबॅगच्या वाहनांची बाजारपेठ उसळेल. मागच्या सीटवर बेल्ट न लावता बसलेल्यांना दंड करण्याचा नियम नवी दिल्लीत दोन वर्षांपासून लागू आहे. पोलिसांनी मागील वर्षभरात या प्रकरणात एकही पावती फाडलेली नाही. यामागे पोलिसांचा निष्काळजीपणा कारणीभूत आहे की कमाईचे नवे शस्त्र म्हणून या नियमाचा दुरुपयोग झाला, याचाही शोध घ्यायला हवा. एकीकडे देशात दर दिवशी ३८ किलोमीटरपेक्षाही वेगाने नवे रस्ते तयार होत असताना पुलांच्या रुंदीकरणाचा झपाटा दिसत नाही. २०२४पर्यंत अमेरिकन दर्जाचे रस्ते निर्माण करण्याची घोषणा केंद्रीय रस्ते मंत्र्यांनी नक्की पूर्ण करावी, मात्र जलदगती महामार्गांवर जागतिक दर्जाच्या प्रवासी सुविधा देण्याचे उद्दिष्ट कुठवर आले याचा खात्रीशीर धांडोळाही घ्यावा. वाहतूक पोलिसांची मनोवृत्ती बदलण्याचे काम सरकारी यंत्रणेलाच करावे लागणार आहे. सापळा रचून सावज पकडणे म्हणजे कर्तव्यदक्षता नाही, हे पोलिसांना शिकवायला हवे. चुका होऊ नयेत, म्हणून वाहनचालकांना वेळीच दक्ष करणे हीदेखील त्यांची जबाबदारी आहे. बहुतांश पोलिस मदतीऐवजी सिग्नल संपताच वाहनधारकांना अटकाव करण्याच्या अविर्भावात असतात.




## आनंदी सकाळ

# जनहितासाठी कृतिशील व्हावे...

वैदिक धर्माचा उत्कर्ष, धर्म-विज्ञान, अध्यात्म-जीवन यांची परस्पर एकरूपता, जनसामान्यात ज्ञानाचा प्रसार व मूल्य जाणिवांचा विकास, लोपलेल्या उदात्त परंपरा, संस्कृतीचे काळानुरूप नवे आचार, भारतीय माणसातली दबलेली शौर्य भावना, अस्मिता व राष्ट्रीयतेची उन्मेष, बंद पडलेले कारखाने पुन्हा सुरू करणे, तंत्र-मंत्राच्या ओंगळ पसाऱ्याला काबूत आणून जरब बसवणे, प्रपंच अध्यात्ममय करुन समृद्ध व्यक्तिमत्वाची पिढी घडवणे, शेतकऱ्यांना अध्यात्माचा आधार देऊन संतांचे स्वप्न व कार्य पूर्ण करणे, ढासळलेली कुटुंबव्यवस्था पुन्हा मजबूत व निष्ठावान करणे, दु:खितांना उपाय देऊन जीवनात उभे करणे, सकारात्मक बनवणे, बहुजन समाजाला वैदिक ज्ञानपरंपरेची योग्य मीमांसा करून सोप्या भाषेत ते उपलब्ध करुन देणे, युवा पिढीला रोजगाराच्या नव्या दिशा देणे, शासनाला जनहितासाठी कृतिशील करणे... अशी एका ना अनेक उज्वल कार्ये प्रत्येकक्षणी दादांनी केली.

# एक उच्च, उदात्त आणि उन्नत असे तत्त्व...






बदल झाला की आशा पालवतात, हा मनुष्यस्वभाव आहे. त्यामुळे सत्ताबदल कुठलाही, कुठेही, कशाही पद्धतीने झालेला असो, आता सारे चांगले होणार, असे वाटल्यास काहीही गैर नाही. त्यात महाराष्ट्रातील सत्तापालट हा तर हिंदुत्वासाठी झालेला. ते काय हे समजा कुणाला नाही नीटसे सांगता आले, तरी ते एक उच्च, उदात्त आणि उन्नत असे तत्त्व आहे हे सर्वांनाच माहीत. त्यामुळे आशा समजा आणखीच उंचावल्या, तरी चालेल. असे सारे एका उंचीवरले वातावरण असताना '१०० कोटी रुपये' हा गतसरकारशी जोडला गेलेला आकडा पुन्हा ऐकू येण्याचे काहीही कारण नव्हते. तरीही गेल्या आठवड्यात लहानशा बातमीतून का होईना, '१०० कोटी' हे शब्द पुन्हा नव्या रंगात, नव्या ढंगात महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश करते झाले. काय तर म्हणे, महाराष्ट्रातील कॅबिनेट मंत्रीपदांसाठी कुणा आमदारांकडे १०० कोटी रुपये मागण्यात आले. मुद्दा १०० कोटींचा नसून, बातमी लहानशीच ठरली, हा आहे.

एखादी बातमी फार मोठी ठरत नाही, याला अगदी तांत्रिक कारणेही असतात. एक तर हे पैसे घेण्यासाठी आलेल्या इसमाला मुंबई पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकाने सापळा रचून पकडले, मग त्याच्याकडून अन्य तिघा साथीदारांचीही नावे कळली.. थोडक्यात, गुन्हे आणि पोलीस यांच्या बातम्या ज्या तऱ्हेने संपणे अपेक्षित असते, तसा शेवट या बातमीचा झाला. मग आता बातमीत आणखी काय लिहिणार? ज्या आमदारांकडे पैसे मागितले गेले त्यांची नावे, ज्या एका आमदाराच्या स्वीय सचिवाने तक्रार नोंदवली त्याचे नाव आणि आरोपींची नावे, हे तपशील बहुतेक प्रसारमाध्यमांनी उघड केले होतेच. तरीही बातमीची लांबी वाढवण्यासारखे काही नसणे, हे झाले तांत्रिक कारण. खंडणीविरोधी पथकाने काय कारवाई केली याबद्दलच्या अन्य प्रसंगी येणाऱ्या बातम्यासुद्धा अशाच असतात, त्या फार लांबरुंद नसतात. म्हणजे ती बातमी आकाराने लहान असण्यात गैर असे काहीही नाही. विशेषत: छापील माध्यमांतील बातम्यांचे आकार लहानमोठे असतातच आणि या आकाराचा संबंध बातमीच्या परिणामकारकतेशी असतोच, असेही नाही. समाज किती सजग आहे, याचाही एखाद्या बातमीची परिणामकारकता ठरवण्यात मोठा असतो. ही बातमी परिणामकारकतेतही 'लहानशीच' ठरली की काय, अशी शंका आज तीन-चार दिवसांनंतर वाचकांसह सर्वांनाच यावी. लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेला एक आमदार, त्याला 'पैसे द्या, मंत्रीपद मिळेल' असा दूरध्वनी करण्याची हिंमत आरोपींमध्ये आली कुठून? संबंधित आमदार महोदयांची भेट मिळवेपर्यंत त्याची मजल गेली कशी? 'मुंबईच्या पोलीस खात्याकडून दरमहा १०० कोटी रुपयांची मागणी महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांनी केली' असा आरोप करणारे मुंबईच्या माजी पोलीस आयुक्तांनी लिहिलेले पत्र ज्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत चर्चेचा विषय ठरले होते.

# ऋण काढून सण कशासाठी?

**गेली दोन वर्षं कोविडमुळे कोणतेही सार्वजनिक सण उत्सव नीटसे साजरे करता आले नाहीत, हे मान्यच. हे लहानमोठे सण उत्सव हा आपल्या सांस्कृतीचा वसा आहे आणि आयुष्यातल्या आनंदाचे निमित्तही आहेत, हेही खरेच.**



पण तेवढेच सत्य हेदेखील आहे की, आपल्यापैकी अनेकांच्या घरात दर पावसाळ्यात पाणी शिरते, घरातले कोणीतरी लोकलमध्ये तासनतास अडकून पडते, ताटातले मासे दिवसागणिक परवडेनासे होत आहेत आणि पुरामुळे भाज्याही खिशाला कात्री लावू लागल्या आहेत. विदर्भ-मराठवाड्यातल्या पुरांपासून युरोपातल्या उष्णतेच्या लाटेपर्यंत सारे काही एकमेकांशी जोडलेले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेतली आणि उत्सव निर्बंधमुक्त केल्याची घोषणा केली. नियमांचा बाऊ करू नका, गणेशोत्सव मंडळांवरील ध्वनिप्रदूषण वगैरेंसारखे 'लहान-मोठे' खटले मागे घ्या, असे आवाहन प्रशासनाला केले. मूर्तींच्या उंचीवर निर्बंध नसतील आणि प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींसंदर्भात निर्णय घेण्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमली जाईल, असेही सांगितले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे शुक्रवारी करोनामुळे विशेष बाब म्हणून यंदा प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना परवानगी देण्यात येईल आणि ही बंदी २०२३ पासून लागू होईल, अशी घोषणा झाली.खरेतर उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयापासून, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, राष्ट्रीय हरित लवाद अशा सर्व संबंधित संस्थांनी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती पर्यावरणासाठी घातक असल्याचे वारंवार स्पष्ट करत त्यावर बंदी घातली आहे. तरीही दरवर्षी हजारोंच्या संख्येने पीओपीच्या मूर्ती समुद्र, नद्या, तलावांत विसर्जित केल्या जातात. हा न्यायालयाचा अवमान ठरत नाही का? कृत्रिम तलावांसारखे पर्याय देण्यात आले असले तरीही ते प्रत्येक ठिकाणी उपलब्ध असतातच असे नाही. यंदा मूर्तींच्या उंचीवरचे निर्बंधही उठवण्यात आले आहेत. अनेक मंडळे १०-१२ फुटांच्या मूर्तींची स्थापना करतात आणि त्या शाडूच्या असल्याचा दावा करतात. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींना न्यायालयानेही मज्जाव केलेला आहे. त्याला यंदापुरती स्थगिती द्या, अशी मागणी पुन्हा होते आहे. शाडूच्या मातीचे वजन आणि त्याचे प्लास्टरपेक्षा भरीव स्वरूप पाहता, त्यातून एवढी उंच मूर्ती तयार करणे अशक्यच. शिवाय एवढ्या मोठ्या मूर्ती कृत्रिम तलावात विसर्जित करणेही शक्य नसते.

## ।। अभंगवाणी ।।



आहे तें सकळ कृष्णा चि अर्पण ।
न कळतां मन दुजें भावी ॥१॥
म्हणउनी पाठी लागतील भूतें ।
येती गवसीत पांचजणें ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### संजय राऊतांच्या जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार?



। मुंबई । महाईन्यूज ।

कथित पत्राचाळ घोटाळ्याप्रकरणी शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांना अटक करण्यात आली आहे. ते सध्या आर्थर रोड जेलमध्ये असून, त्यांना अद्यापही जामीन मंजूर झाला नाही आहे. त्यात संजय राऊत यांचे भाऊ शिवसेना आमदार सुनिल राऊत त्यांच्या जामिनासाठी सक्रिय झाले आहे. सुनिल राऊत यांनी मातोश्रीवर जात शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरेंची भेट घेत दिल्ली गाठली होती. त्यामुळे याबाबत ते सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार का?, भाजपाच्या काही वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करणार का?, अशा चर्चांना उधाण आलं होते. त्यावर आता सुनिल राऊत यांनी स्पष्टीकरण दिलं आहे.

# मुंबईकर उद्धव ठाकरेंच्या पाठिशी खंबीर!

## मुंबईकर उद्धव ठाकरेंच्या पाठिशी खंबीर मनसे-भाजपा-शिंदे गट युतीवर वरुण सरदेसाईंची टीका



। मुंबई । महाईन्यूज ।

एकनाथ शिंदेनी शिवसेनेबरोबर केलेल्या बंडखोरीनंतर राजकीय समीकरण बदलली आहेत. त्यातून आता अगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेनेविरोधात शिंदे गट आणि भाजपानेही कंबर कसली आहे. तर दुसरीकडे राज ठाकरेंच्या भेटीनंतर शिंदे गट, भाजपा आणि मनसेमध्ये युती होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर युवासेनेचे सरचिटणीस वरुण सरदेसाईंनी मनसे, भाजपा आणि शिंदे गटावर निशाणा साधला आहे. "गेल्या ३० वर्षात शिवसेनेने, उद्धव ठाकरेंनी अनेक आव्हानं पेलली आहेत. यंदाचेही आव्हान आम्ही पेलू. समोर कुणीही येवो, कुणाचीही युती व्हावी. ३ पक्ष काय ३० पक्ष एकत्र आले तरीही मुंबईकर उद्धव ठाकरेंच्या पाठिशी खंबीर आहेत, असा खोचक टोला लगावला आहे.

### मुंबई महानगरपालिका निवडणुक शिवसेना जिंकणार...

शिवसेनेच्या निर्धार अभियानाची सुरुवात करण्यासाठी वरुण सरदेसाई सध्या सोलापूर दौऱ्यावर आहेत. तुळजापूरमध्ये अंबाबाईचे दर्शन घेऊन त्यांनी अभियानाला सुरुवात केली. यावेळी ते म्हणाले की, वारंवार निवडणुका पुढे ढकलण्यापेक्षा निवडणुका जाहीर करा. मुंबई महापालिका निवडणुकीला सामोरं जायला शिवसेना तयार आहे. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वात आम्ही केवळ निवडणूक लढणार नाही तर जिंकणार आहोत, असा विश्वास सरदेसाईंनी व्यक्त केला.

### मनसे नेते मुख्यमंत्र्यांच्या भेटीला


गेल्या काही दिवसांपासून शिंदे गट, भाजपा आणि मनसेत वाढत्या जवळीकीमुळे चर्चांना उधाण आले आहे. एकनाथ शिंदेसह देवेंद्र फडणवीस आणि भाजपाच्या नेत्यांनी गणेशोत्सव काळात मनसे अध्यक्ष राज ठाकरेंची भेट घेतली होती. अजूनही या भेटीगाठींचे सत्र सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. नुकतीच मनसेचे नेते संदीप देशपांडे (SANDEEP DESHPANDE) आणि संतोष धुरी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. या भेटीमुळे अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

### मनसे आणि शिंदे गटात जवळीक

शिंदे गट आणि मनसे युतीबाबत मनसे विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांनी मोठ विधान केलं आहे. मनसे आणि शिंदे गटामध्ये जवळीक निर्माण झाली असल्याचे अमित ठाकरे म्हणाले आहेत. मात्र, युतीबाबत मनसे अध्यक्ष राज ठाकरेचं निर्णय घेतील असंही अमित ठाकरे म्हणाले.

# शेतकऱ्यांसाठी खुशखबर!

## शेतकऱ्यांना दरवर्षी मिळणार सहा हजार



। मुंबई । महाईन्यूज ।

### राज्यात 'मुख्यमंत्री किसान योजना' लागू होणार

राज्यातील शेतकऱ्यांसाठी शिंदे-फडणवीस सरकारने मोठा निर्णय जाहीर केला आहे. केंद्रातील पंतप्रधान किसान योजनेच्या धर्तीवर राज्यात आता 'मुख्यमंत्री किसान योजना' लागू करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना वर्षाकाठी सहा हजार रुपये मिळणार आहेत. या योजनेसाठी पात्र शेतकऱ्यांच्या निकषांबाबत लवकरच निर्णय जाहीर केला जाणार आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या सोडवण्यासाठी २०१८ मध्ये केंद्र सरकारकडून पंतप्रधान किसान योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत केंद्र सरकारकडून दरवर्षी शेतकऱ्यांच्या खात्यात सहा हजार रुपये जमा करण्यात येतात. दोन हजार रुपयांच्या तीन हप्त्यांमध्ये या पैशांचे शेतकऱ्यांना वितरण केले जाते. अशाचप्रकारची योजना लवकरच महाराष्ट्रात राज्य सरकारकडून लागू केली जाणार आहे.

# शिवसेना महापौरांच्या निवासस्थानावर गणेश मंडळ कार्यकर्त्यांकडून पेटत्या सुतळी बॉम्बसह दगडफेक!

## 4 जण ताब्यात; महापालिका विरोधी पक्षनेत्याच्या घरावर दगडफेक

। जळगाव । महाईन्यूज ।



जळगाव जिल्ह्यात सर्वत्र गणेश विसर्जन शांततेत पार पडत असताना शुक्रवारी (९ सप्टेंबर) रात्री अकराच्या सुमारास शहरातील मेहरुण परिसरात धक्कादायक प्रकार घडला. मेहरुण परिसरातील महापौर जयश्री महाजन व विरोधी पक्षनेते सुनील महाजन यांच्या निवासस्थानावर एका सार्वजनिक गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विसर्जन मिरवणुकीदरम्यान फटाके, गुलाल उधळत दगडफेक केली. त्यामुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अठरा संशयितांविरुद्ध गुन्हा करण्यात आला आहे. पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेतले आहे.

### महापौरांच्या मोटारीच्या काचाही फोडल्या

मेहरुण परिसरात महापौर जयश्री महाजन व विरोधी पक्षनेते सुनील महाजन यांच्या निवासस्थानाजवळून एका सार्वजनिक गणेश मंडळाची मिरवणूक जात होती. त्यावेळी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी महापौर महाजन यांच्या निवासस्थानावर गुलाल फेकत दगड व पेटते सुतळी बॉम्बसुद्धा फेकले. यानंतर कार्यकर्त्यांनी गणरायाची मूर्ती तिथेच सोडून देत पळ काढला. पळून जाण्यापूर्वी या कार्यकर्त्यांनी महापौर महाजन यांच्या मोटारीच्या काचाही फोडल्या. ही घटना घडली त्यावेळी महापौर महाजन घरी नव्हत्या. त्यांच्या जाऊबाई आणि नुकतीच शस्त्रक्रिया झालेले त्यांचे सासरे घरात होते. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी महापौर महाजन यांच्या निवासस्थानावर गुलाल उधळला. यावेळी महापौर महाजन यांच्या जाऊबाईंनी संबंधित मंडळाच्या कार्यकर्त्यांची समजावण्याचा प्रयत्न केला. घरात सासरे आजारी असल्याचेही सांगितले.

# तुम्हाला सांगतो, या सरकार-बिरकारच्या भरंवशावर राहू नका!

## नागपुरात नितीन गडकरींचा शेतकऱ्यांना सल्ला!

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी हे त्यांच्या मिश्किल स्वभावामुळे सर्वपरिचित आहेत. अनेक सभा आणि कार्यक्रमांमधून नितीन गडकरींनी स्टेजवर केलेल्या भाषणात जोरदार टोलेबाजी केली आहे. अनेकदा तर त्यांनी आपल्याच पक्षाच्या सरकारचे कान देखील टोचले आहेत. सरकारच्या कारभारावर नाराजी व्यक्त करताना गडकरी मागेपुढे पाहात नाहीत, असा त्यांचा इतिहास आहे. या पार्श्वभूमीवर नितीन गडकरींचं भाषण म्हणजे अशाच खुमासदार टोलेबाजीने भरलेली असणार, हे गणितच झालं आहे. नुकतीच गडकरींनी नागपुरात एका कार्यक्रमात बोलताना केलेली टोलेबाजी अशीच उपस्थितांचा हशा मिळवून गेली.



नितीन गडकरींनी नागपूरमध्ये झालेल्या ॲग्रो व्हिजन फाऊंडेशनच्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमात नितीन गडकरींनी शेतकऱ्यांना उत्पादन आणि बाजारपेठ यासंदर्भात मार्गदर्शन केलं. यावेळी बोलताना त्यांनी मालासाठी बाजारपेठेचं गणित कसं जुळवून आणायचं, यावर बोलताना केलेल्या टिप्पणीमुळे उपस्थितांमध्ये हास्याची लकेर उमटली. "मी ठरवलंय की माझ्या गाडीतून दररोज माल रात्री १० वाजता भाजीमार्केटमध्ये येईल.. ६०० किलो, ८०० किलो. तो मला २५ रुपयांच्या वर रेट देतो. मला आरामात ३०-४० हजार रुपये दोन दिवसाला मिळतात. माझं मार्केट एस्टॅब्लिश झालं. आता मला भाजी विकायला अडचण नाही. मी माझं मार्केट स्वतःच शोधलं. तुमचं मार्केट तुम्ही शोधा", असं गडकरी यावेळी म्हणाले.

"मी तुम्हाला सांगतो हे सरकार-बिरकार फार भरवशावर राहू नका

### एक तर आपला देवावर विश्वास, नाहीतर...

**दरम्यान, फक्त परमेश्वरावर अवलंबून न राहाता स्वत: देखील प्रयत्न करावे लागतात, असा संदेश यावेळी गडकरींनी उपस्थित शेतकऱ्यांना दिला. यावेळी त्यांनी एक विनोदी उदाहरण दिलं. "आपल्याकडे दोन गोष्टी आहे.. एक तर आपला विश्वास साराकारवर आहे किंवा परमेश्वरावर आहे. मुलगा झाला तर लगेच लोक म्हणतात, अरे वा, परमेश्वरानं दिला. आरे बाबा तुझं लग्न झाल्यानंतर तू पुढचा काही कार्यक्रम केला नसता तर मुलगा कसा झाला असता? परमेश्वर आवश्यक आहेच. पण तुझे प्रयत्नही आवश्यक आहेत ना", असं गडकरींनी म्हणताच उपस्थितांमध्ये हशा पिकला.**

**नितीन गडकरींनी नागपूरमध्ये झालेल्या ॲग्रो व्हिजन फाऊंडेशनच्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमात नितीन गडकरींनी शेतकऱ्यांना उत्पादन आणि बाजारपेठ यासंदर्भात मार्गदर्शन केलं. यावेळी बोलताना त्यांनी मालासाठी बाजारपेठेचं गणित कसं जुळवून आणायचं, यावर बोलताना केलेल्या टिप्पणीमुळे उपस्थितांमध्ये हास्याची लकेर उमटली. "मी ठरवलंय की माझ्या गाडीतून दररोज माल रात्री १० वाजता भाजीमार्केटमध्ये येईल.. ६०० किलो, ८०० किलो. तो मला २५ रुपयांच्या वर रेट देतो. मला आरामात ३०-४० हजार रुपये दोन दिवसाला मिळतात. माझं मार्केट एस्टॅब्लिश झालं. आता मला भाजी विकायला अडचण नाही. मी माझं मार्केट स्वतःच शोधलं. तुमचं मार्केट तुम्ही शोधा", असं गडकरी यावेळी म्हणाले.**

## शॉर्ट न्यूज »

### अतिवृष्टीग्रस्तांना राज्य सरकारकडून दिलासा!



।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यातील अतिवृष्टीग्रस्त नागरिकांना शिंदे सरकारकडून दिलासा देण्यात आला आहे. राज्यात जून ते ऑगस्टदरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे आणि शेतजमिनीचे अतोनात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी राज्य सरकारने ३ हजार ५०१ कोटी रुपये जिल्ह्यांना सुपूर्त केले आहेत. जिरायत शेतीसाठी प्रति हेक्टर १३ हजार ६०० रुपये, बागायत पिकांसाठी २७ हजार तर बहुवार्षिक पिकांसाठी प्रति हेक्टर ३६ हजारांची मदत सरकारकडून करण्यात आली आहे. तीन हेक्टरपर्यंत शेतजमीन असलेल्या शेतकऱ्यांना ही मदत केली जाणार आहे.


# राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदी शरद पवार यांची पुन्हा बिनविरोध निवड!

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्यकारणी अधिवेशन दिल्लीत ताल कटोरा स्टेडियम येथे उत्साहात

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी शरद पवार यांची पुन्हा बिनविरोध निवड झाली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्य समितीची आज बैठक झाली. या बैठकीत एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्यकारणी अधिवेशन दिल्लीत ताल कटोरा स्टेडियम येथे पार पडले.

या राष्ट्रीय कार्यसमितीच्या बैठकीत शरद पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली आहे. याबाबत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रवक्ते रविकांत वरपे यांनी ट्विट करून याबाबतची माहिती दिली आहे. 'आदरणीय अध्यक्ष शरद



पवार यांच्या नेतृत्वात या देशामध्ये पुरोगामी, धर्मनिरपेक्ष सर्वसमावेशक विचारांचा प्रसार करू व भारतीय लोकशाही बळकट करू', असे ट्विट विकांत वरपे यांनी केले आहे.65 मेट्रिक टन आहे.

कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे पार पडलेल्या राष्ट्रीय कार्यसमितीच्या बैठकीत आदरणीय शरद पवार यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादीच्या दिल्लीत पार पडलेल्या राष्ट्रीय कार्यसमितीच्या बैठकीत शरद पवार यांची सर्वानुमते राष्ट्रीय अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली. या बैठकीला शरद पवार यांच्यासह विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह राष्ट्रवादीचे आमदार, खासदार आणि सर्व ज्येष्ठ नेते उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिवेशनात पक्षाचा नव्या राष्ट्रीय अध्यक्षाबद्दल ठराव मांडण्यात आला. या ठरावाला सर्व सदस्यांनी एकमताने मंजूरी देण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीसाठीच आज कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

**राष्ट्रवादीच्या दिल्लीत पार पडलेल्या राष्ट्रीय कार्यसमितीच्या बैठकीत शरद पवार यांची सर्वानुमते राष्ट्रीय अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली. या बैठकीला शरद पवार यांच्यासह विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह राष्ट्रवादीचे आमदार, खासदार आणि सर्व ज्येष्ठ नेते उपस्थित होते. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अधिवेशनात पक्षाचा नव्या राष्ट्रीय अध्यक्षाबद्दल ठराव मांडण्यात आला. या ठरावाला सर्व सदस्यांनी एकमताने मंजूरी देण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीसाठीच आज कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली होती.**

### गुजरातेत एटीएसची मोठी कारवाई;

# दुबईतून आलेले 200 किलो ड्रग्ज जप्त

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



गुजरात एटीएसने ड्रग्ज विरोधात मोठी कारवाई केली आहे. गुजरात एटीएस आणि डीआरआयने कोलकाता येथे केलेल्या कारवाईत तब्बल 200 कोटीचे ड्रग्ज जप्त केले आहे. स्क्रॅप बॉक्समध्ये 40 किलो ड्रग्ज दुबई येथून भारतात आणले जात असल्याची माहिती समोर आली आहे.

मागील काही महिन्यापासून गुजरात एटीएसकडून अंमली पदार्थ विरोधात कारवाई करण्यात येत आहे. काही महिन्यांपूर्वी गुजरात एटीएसने अंमली पदार्थांचा साठा जप्त केला होता. मिळालेल्या माहितीनुसार, दुबईवरून आणलेले हे ड्रग्ज गिअर बॉक्समध्ये लपवण्यात आले होते. गुजरात एटीएसला या प्रकरणाची माहिती मिळाली होती. गुजरात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 12 गिअर बॉक्समध्ये हे अंमली पदार्थ लपवण्यात आले होते.हे ड्रग्ज दुबईच्या जेबेल अली पोर्ट येथून शिपिंग कंटेनरमध्ये पाठवण्यात आले. हे ड्रग्ज फेब्रुवारी महिन्यात कोलकात्यातील बंदरगाह येथे पोहचले सेन्च्युरी कंटेनर फ्रेट स्टेशनमध्ये 'गिअर बॉक्स' च्या मोहिम राबवण्यात आले होते. अतिशय चलाखीने हे माफिया भारतात ड्रग्ज आणत असल्याची माहिती समोर आली आहे. 36 गिअर बॉक्सपैकी ड्रग्ज बॉक्स ओळख पटण्यासाठी 12 गिअर बॉक्सला पांढऱ्या रंगाची खूण करण्यात आली होते.

# 'बिग बॉस मराठी'चे चौथे पर्व २१ दिवसांनी प्रेक्षकांच्या भेटीला




**छोट्या पडद्यावरील वादग्रस्त कार्यक्रम म्हणून 'बिग बॉस' या कार्यक्रमाकडे पाहिलं जातं. 'बिग बॉस मराठी' हा शो लोकप्रिय शोपैकी एक आहे. 'बिग बॉस मराठी'चे तीनही पर्व चांगलेच लोकप्रिय ठरले होते. बिग बॉसच्या स्पर्धकांमधील राडे, नवनवीन टास्क, मैत्री आणि होणारे वाद यामुळे हा शो कायमच लोकप्रिय म्हणून ओळखला जातो. बिग बॉसचे तीनही पर्व हिट ठरल्यानंतर आता लवकरच चौथे पर्व प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वी बिग बॉसच्या चौथ्या पर्वाचा टीझर प्रदर्शित झाला होता. त्यानंतर आता त्याच्या प्रक्षेपणाची तारीख समोर आली होती.**

कलर्स मराठीच्या अधिकृत इन्स्टाग्राम पेजवर बिग बॉसच्या चौथ्या पर्वाचा आणखी एक प्रोमो प्रदर्शित करण्यात आला आहे. कलर्स मराठीने शेअर केलेला हा प्रोमो अगदीच हटके पद्धतीचा आहे. या पर्वात महेश मांजरेकर अगदी हटके भूमिकेत दिसत आहे. यात ते विविध भूमिका साकारताना दिसत आहे. यात महेश मांजरेकर कधी पोस्टमन, कधी अम्पायर, तर कधी शाळेतला कडक मास्तर अशा भूमिकेत दिसत आहे. हा प्रोमो शेअर करताना त्यांनी बिग बॉस कधीपासून सुरु होणार? याची तारीख जाहीर केली आहे. 100 दिवसांचा हा खेळ, कधी पास, कधी फेल. पण महेश सरांच्या मते, यंदा 'All is well' पाहायला विसरू नका "BIGG BOSS मराठी" Grand Premiere 2 ऑक्टोबरला संध्या 7 वा, सोम – शुक्र रात्री 10 वा, शनि- रवि रात्री 9:30 वा फक्त कलर्स मराठीवर!, असे कॅप्शन कलर्सने या प्रोमोला दिले आहे. त्यांची ही पोस्ट सध्या व्हायरल होताना दिसत आहे. येत्या २ ऑक्टोबरपासून बिग बॉस मराठीचे चौथे पर्व सुरु होणार आहे. आता या बिग बॉस मराठीमध्ये कोण कोण कलाकार असणार, पुन्हा तोच राडा होणार का? मैत्री आणि प्रेमाचे वारे वाहणार का? याची चर्चा रंगण्यास सुरुवात झाली आहे. त्यातच बिग बॉस मराठीमुळे पुन्हा एकदा प्रेक्षकांचं भरपूर मनोरंजन होणार असल्याचे दिसत आहे. तसेच यात सहभागी होणारे स्पर्धक कोण असणार याबद्दल उत्सुकता पाहायला मिळत आहे.

# 'ब्रह्मास्त्र'मध्ये दीपिका पदुकोण साकारतेय रणबीरच्या आईची भूमिका?

दीपिका पदुकोण या चित्रपटात रणबीर कपूरच्या आईची भूमिका साकारत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

आलिया भट्ट आणि रणबीर कपूरचा ब्रह्मास्त्र काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झाला. या चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता होती. आता हा चित्रपट बॉक्स ऑफिसवरचा दुष्काळ हटवणार का याचीही उत्सुकता आहे. 'ब्रह्मास्त्र'ची वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत होता. ११ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अयान मुखर्जीने मल्टी स्टार्ससह 'ब्रह्मास्त्र' पूर्ण केला. रणबीर कपूर, आलिया भट्ट, अमिताभ बच्चन, मौनी रॉय, नागार्जुनसह अनेक कलाकार या चित्रपटात दिसत आहेत. तर शाहरुख खान आणि दीपिका पदुकोण या चित्रपटात पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत आहेत. चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर दीपिका पदुकोण या चित्रपटात रणबीर कपूरच्या आईची भूमिका साकारत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.





'ब्रह्मास्त्र' पाहिल्यानंतर प्रेक्षकांनी सोशल मीडियावर त्याचे स्पॉयलर शेअर करण्यास सुरुवात केली आहे. 'ब्रह्मास्त्र'मध्ये दीपिका पदुकोणचीही भूमिका असल्याचा दावा चाहते करत आहेत. दीपिका पदुकोणचीही 'ब्रह्मास्त्र'मध्ये खूप खास भूमिका आहे असा दावा प्रेक्षक करत आहेत. युजर्सचे म्हणणे आहे की दीपिकाने तिचा एक्स बॉयफ्रेंड रणबीर कपूरच्या आईची भूमिका साकारली आहे. 'ब्रह्मास्त्र'मध्ये रणबीर कपूर शिवाच्या भूमिकेत आहे, ज्याने लहानपणीच आपले आई-वडील गमावले होते. शिवा १ वर्षाचा असताना त्याची आई आगीत होरपळून मेलेली असते.



# "जेव्हा लोक विचारतात, वय झालंय लग्न कधी करणार?

मराठी मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्रींमध्ये ऋतुजा बागवे हिचा देखील समावेश होतो. नाटक, मालिका, चित्रपट अशा विविध माध्यमात काम करत ती प्रेक्षकांच्या भेटीस येत असते. अभिनयाबरोबरच ऋतुजा सोशल मीडियावरही खूप सक्रिय आहे. ऋतुजा तिच्या चाहत्यांशी सोशल मीडियाद्वारे संवाद साधत असते. सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या आयुष्यात घडणाऱ्या ताज्या घडामोडी ती चाहत्यांना सांगत असते. नुकतीच तिने एक आनंदाची बातमी तिच्या चाहत्यांना दिली आहे. अभिनेत्री ऋतुजा बागवे हिचा काल वाढदिवस झाला. या वाढदिवसानिमित्त तिने केलेली पोस्ट ही चर्चेचा विषय ठरत आहे. या वाढदिवसाला तिने स्वतःलाच एक मोठी भेट दिली आहे. ती म्हणजे, तिने स्वतःचं पहिलं घर घेतलं आहे. काल त्या घरी ती तिच्या कुटुंबियांसोबत गेली होती. त्यावेळचे काही फोटो तिने पोस्ट करत तिला पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाचे तिने आभार मानले आहेत.

हे फोटो पोस्ट करत तिने लिहिले, "स्वतःचं घर. हॅप्पी बर्थडे टू मी. ही माझी माझ्या घराला दिलेली पहिली भेट. जेव्हा लोक विचारतात की, वय झालंय लग्न कधी करणार? तेव्हा माझी आई म्हणाली, वय झालं म्हणून नाही तुला जेव्हा करावास वाटेल तेव्हा लग्न पण. पण त्या आधी स्वावलंबी हो, स्वतःचं घर घे. आई हे स्वप्न तू मला दाखवलस त्याबद्दल तुझे खूप आभार. मला माहित असलेली तू सर्वात कणखर व्यक्ती आहेस.

बाबा तुमच्या शिवाय हे शक्य झालं नसतं. आईने स्वप्न दाखवल पण तुम्ही पाठीशी होतात म्हणून घेतली उडी. तुम्ही बापमाणूस आहात. भौतिक गोष्टित मी यश नाही मानात ना समाधान शोधत पण तूमचं स्वप्न पूर्ण करु शकले ह्याचा आनंद खुप आहे, जो मी शब्दात नाही मांडू शकत. तुमच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि अभिमानाने पाणावलेले डोळे मला मेहनत घेऊन काम करण्यासाठी शक्ती देतात. मी खरोखर भाग्यवान आहे कारण तुम्ही माझे आई वडील आहात." यासोबतच या यामध्ये तिला पाठिंबा देणाऱ्या तिच्या मित्र-मैत्रिणींचेही तिने आभार मानले आहेत. तिच्या या पोस्टवरती तिच्या चाहत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# टिळकांनी याच साठी केला होता अट्टाहास...!"

अभिनेता वैभव मांगले सध्या खूप चर्चेत आहे. त्याने मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीमध्येही काम केले आहे. 'टाईमपास', 'पावनखिंड', 'शेर शिवराज', 'काकस्पर्श', 'शिक्षणाच्या आयचा घो', 'फत्त लढ म्हणा' अशा अनेक चित्रपटांमध्ये वैभवने महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. त्याने बऱ्याच गाजलेल्या नाटकांमध्येही काम केले आहे. वैभव अत्यंत स्पष्टवक्ता नट आहे. तो समाजातील वेगवेगळ्या विषयांवर व्यक्त होत असतो. सध्या अशाच एका वक्तव्यामुळे वैभव मांगले चर्चेचा विषय बनला आहे.

वैभव मांगले फेसबुक या सोशल मीडिया साईटवर खूप सक्रिय आहे. तो फेसबुकवर फोटो-व्हिडीओ पोस्ट करत असतो. लॉकडाऊनच्या काळात वैभवने चित्रकला जोपासली होती. तो सोशल मीडियावर त्याने काढलेली चित्रे देखील शेअर करत असतो. करोना काळामध्ये सरकारने सणांवर काही निर्बंध लादले होते. महामारीचे संकट ओसरल्यावर गणेशोत्सवासह सर्व सणांवरील बंधने काढण्यात आली. त्यामुळे यंदा गणेशोत्सव हा सण देशभरात दुप्पट जल्लोषात साजरा केला गेला. याच काळात अभिनेता वैभव मांगले याने फेसबुकवर केलेली पोस्ट चर्चेचा विषय ठरली आहे. "टिळकांनी याच साठी केला होता अट्टाहास...!" असे म्हणत वैभवने त्याच्या मनातील राग व्यक्त केला आहे. या पोस्टच्या खाली कमेंट बॉक्समध्ये त्याने "राजकारण्यांच्या हातात आपल्या धार्मिक, नैतिक, सामाजिक, आर्थिक नाड्या गेल्या आहेत हे आता तरी लोकांच्या लक्षात येईल का ??? आणि या आपणच दिल्या आहेत." अशी कमेंट देखील केली आहे.



या पोस्टच्या खाली काहीजणांनी वैभवच्या वक्तव्याचे समर्थन केले आहे. त्याच्या या पोस्टखाली कमेंट केलेल्यांपैकी अनेकांनी गणेशोत्सवासंदर्भातले त्यांचे वाईट अनुभव मांडले आहेत. तसेच बऱ्याच जणांनी वैभवच्या मताला विरोध करत 'आम्हाला शिकवू नका' असे म्हटले आहे. त्याने पोस्टमध्ये स्पष्टपणे गणेशोत्सवाचा उल्लेख केला नसला, तरी त्याच्या या पोस्टचा गणेशोत्सवाशी संदर्भ जोडला जातोय, त्यामुळे यावरून नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

## शॉर्ट न्यूज »

### मराठमोळ्या भावनाने केले जागतिक अजिंक्यपदाचे



**कोलकाता। महाईन्यूज**

तरूणांना लाजवेल अशा याती एका भारतीय लष्करी अधिकाऱ्याची पत्नी आहे, दोन किशोरवयीन मुलांची आईही आहे आणि सध्या तिनं वयाची 'फक्त' 50 वर्ष पूर्ण केली आहेत. एके काळी पूर्णवेळ गृहिणी असलेल्या या आईला तिचा पती आणि मुले नेहमीच पाठिंबा देतात. तरूणांना लाजवेल अशा या उत्साही जागतिक दर्जाच्या पॉवरलिफ्टरचं नाव आहे भावना भावे टोकेकर. भावनानं वयाच्या 41 व्या वर्षी वजन उचलण्यास सुरुवात केली आणि आज ती यशस्वी पॉवरलिफ्टर आहे. इन्टाग्रामवर तिचे हजारों चाहते तिच्या सुवर्ण कामगिरीच्या पोस्टकडे नजर लावून असतात हे विशेष. भावनानं इंग्लंडमध्ये मँचेस्टर इथं नुकत्याच झालेल्या जागतिक पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत पूर्ण पॉवरलिफ्टिंग आणि बेंच प्रेस इव्हेंटमध्ये 75 किलो वजनी गटात अव्वल क्रमांक पटकावला.

# तब्बल 11 वर्षांनी एकत्र खेळणार दिग्गज खेळाडू!

## चौकार षटकारांचा पडणार पाऊस

**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।**

इंडिया लिजेंड्स संघाचे एकीकडे यूएईमध्ये आशिया चषक स्पर्धा सुरू असताना आता दुसरीकडे रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीजला आजपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत जगभरातील दिग्गज क्रिकेटपटू पुन्हा एकदा खेळताना दिसणार आहेत. या स्पर्धेतील पहिली लढत ही इंडिया लिजेंड्स आणि दक्षिण आफ्रिका लिजेंड्स यांच्यात कानपूरमधील ग्रीन पार्क स्टेडियमवर होणार आहे. दरम्यान या सामन्यात तब्बल ११ वर्षांनी क्रिकेट जगातील तीन दिग्गज खेळाडू सोबत खेळताना दिसणार आहेत. इंडिया लिजेंड्स संघाचे कर्णधारपद सचित तेंडुलकर भुषवणार आहे. याच संघामध्ये माजी क्रिकेटपटू युवराज सिंग आणि सुरेश रैना झळकणार आहेत. या तिन्ही खेळाडूंनी आपली कारकीर्द चांगलीच गाजवलेली असून ते आता पुन्हा एकदा तब्बल ११ वर्षांनी सोबत दिसणार आहेत. या सामन्यात




तेंडुलकर, युवराज सिंग आणि सुरेश रैना यांच्याकडून चौकार आणि षटकार यांची मेजवानी पाहायला मिळणार आहे.

रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीज येत्या १० सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधित खेळवली जाणार आहे. या सिरीजमध्ये जगभरातील दिग्गज क्रिकेटपटू सहभागी होतील. सचिनने रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीजच्या पहिल्या हंगामातही सहभाग नोंदवला होता. सचिनसोबत नमन ओझा, इरफान पठाण, युसूफ पठाण, राहुल शर्मा तसेच युवराज सिंगसह इतर खेळाडूदेखील दिसतील. बाद फेरीचे सामने २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधित होतील. या स्पर्धेच्या पहिल्या हंगामात एकूण सात संघांनी सहभाग नोंदवला होता. यावर्षी न्यूझीलंड लिजेंड्स या आणखी एका संघाचा समावेश झाला आहे. म्हणजेच या हंगामात इंडिया लिजेंड्स, ऑस्ट्रेलिया लिजेंड्स, श्रीलंका लिजेंड्स, वेस्ट इंडिज लिजेंड्स, दक्षिण आफ्रिका लिजेंड्स, बांगलादेश लिजेंड्स, इंग्लंड लिजेंड्स आणि न्यूझीलंड लिजेंड्स असे एकूण आठ संघ सहभागी होतील.

# 'सध्याच्या खेळाडूंपेक्षा तू अधिक सरस'

## मारिया शारापोवाने टेनिसपटू सेरेना विल्यम्सला दिला होता विवृत्ती न घेण्याचा सल्ला



**।न्यूयॉर्क । महाईन्यूज ।**

अमेरिकेची स्टार टेनिसपटू सेरेना विल्यम्सने निवृत्त होत असल्याचे सूतोवाच केले आहे. विल्यम्सने लवकरच संन्यास घेणार असल्याचे सांगितल्यानंतर जभरातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. दरम्यान रशियाची माजी टेनिसपटू मारिया शारापोवाने सेरेनाला तिने लगेच संन्यास घेऊ नये, असा सल्ला वर्षभरापूर्वीच दिला होता. याबाबतची माहिती खुद्द मारिया शारापोवाने दिली आहे. मारिया शारापोवाने सेरेना विल्यम्सला आताच निवृत्ती घेऊ नको असा सल्ला वर्षभरापूर्वीच दिला होता. मागील वर्षी मेट गाला समारोहामध्ये मारिया शारापोवा आणि सेरेना विल्यम्स यांची भेट झाली होती. याच भेटीबद्दल शारापोवाने अधिक माहिती दिली आहे. "आम्ही मागील वर्षी एकमेकांना भेटलो. या भेटीमध्ये आमच्यात निवृत्तीबद्दल चर्चा झाली. त्यावेळी मी आज जे खेळाडू आहेत, त्यांच्यापेक्षा तू उत्तम खेळतेस. त्यामुळे तू टेनिस कोर्टमध्ये जायला हवं, असं विल्यम्सला सांगितले होते," असे मारिया शारापोवाने सांगितले आहे.

दरम्यान, २०२१ साली सेरेना विल्यम्सच्या पायाला दुखापत झाली होती. या दुखापतीतून सावरल्यानंतर सेरेनाने २०२२ साली विम्बल्डन स्पर्धेच्या माध्यमातून टेनिस कोर्टवर पुनरागमन केले होते. मात्र या स्पर्धेत ती पहिल्याच फेरीमध्ये बाद झाली.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही